# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०१/२०२२ (बुधवार)**

---

## घरफोडी

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा राजोली टोली येथे दि. २३.०१.२२ चे २१.३० ते दि. २४.०१.२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रामदास चमरूजी दिवे वय ६५ वर्ष, रा. राजोली यांचे घराचे दाराचे अज्ञात आरोपीने कडी कोंडा तोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने किंमती २२,०००/–रू. व अशोक दोडकु घोल्लर यांचे घरी ठेवलेले सोन्याचे दागिने किमती २२,०००/–.रू. व नगदी १२,०००/–.रू. असा एकुण कि. ३४,०००/–.रू. दागिने व नगदी असा एकुण ५६,००० /–रुपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक इंगळे मो. नं. ९९२३४६३४६१ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

१) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ८ कि.मी. अंतरावरील मौजा चारगाव मुंगलाई शिवार येथे दिनांक २५/०१/२०२२ चे ०९.३० वा. ते १०.०० वा. दरम्यान **भिमराव बापुराव हाते (मृतक), वय ५० वर्ष, रा. धामणगाव गवळी ता. भिवापूर** हे आपली एम.एच– ४०/बिडी– ६७३० क्रमांकाच्या मोटरसायकल ने बेसुर मार्गे उमरेड जात असता उमरेड कडुन बेसुर कडे जाणाऱ्या एम.एच– ३१/ सि.बी– ७७७७ क्रमांकाच्या १० चक्का ट्रक चा चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक मारून घटनास्थळावर ट्रक सोडुन पळुन गेला व मृतकाचे तरणास कारणीभूत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक ओमप्रकाश रेहपाडे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवी. सहकलम १८४, १३४ अ, ब मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री पाटील हे करीत आहे.

२) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा मांडवा खिंड शिवार येथे दिनांक २४/०१/२०२२ चे १९.४५ वा. ते २०.०० वा. दरम्यान **रविंद्र मारोती धोटे (मृतक), वय ३२ वर्ष, रा. बेसुर** हा मांगरूळ फाटयावरील नायरा पेट्रोल पंपावर काम करून तो नेहमी प्रमाणे आपली मोटरसायकल क्र. एम.एच– ४०/ए.डब्लु– ५१३४ ने उमरेड मार्गे बेसुर कडे जात असतांना अज्ञात चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला समोरून धडक मारून गंभिर जखमी करून पळुन गेला व मृतकाचे मरणास कारणीभुत झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि राजु डोर्लीकर पोस्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादंवी. सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री पाटील पोस्टे उमरेड हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. मौदा – दिनांक २४/०१/२०२२ चे १८.०० वा. चे सुमारास पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादीयांची १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही शेजारी राहणाऱ्यांच्या घरी थांबली होती. परंतु ती दुकानात जाते असे सांगून गेली ती परत आली नाही कोणालाही काहीही न सांगता निघुन गेली. तिचा शोध घेतला असता मिळुन आली नाही. यातील संशयीत आरोपी नामे– विक्की लांडगे रा.मारोडी मौदा फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले असावे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री चौधरी मोक्र ९८२३२१७२०५ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा हेटी सुरला शिवार २४/०१/२०२२ चे १९.३० वा. दरम्यान फिर्यादीचा भाऊ **रविन्द्र जवाहरलाल देशमुख(मृतक), वय ४९ वर्ष, रा, वार्ड क्र ०३ तेलकामठी** हा त्याचे मौजा हेटी सुरला शिवारातील शेतात पिकाला पाणी ओलण्याकरिता गेला असता शेतातील विहीरीला तोंडी नसल्याने व रात्र असल्याने विहीरीतील पाण्यात पडला व मरण पावला आहे.

सदर प्रकर.ाी फिर्यादी नामे– किशोर जवाहरलाल देशमुख वय ४७ वर्ष रा. वार्ड क्र. ०३ तेलकामठी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक देवेन्द्र भूरे मो.क्र ९५८८६७९८१४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर